# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम/सीईटी /२०१७/ ८५५
दिनांक : - 8 AUG 2017

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणा-या सामायिक प्रवेश परीक्षेचा (MHT-CET) दर्जा व अभ्यासक्रमाबाबत....

**संदर्भ** : - १) शासन निर्णय शासन निर्णय उच्च् व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१४/प्र.क्र.२७३/तांशि ४, दिनांक २७.२.२०१७
२) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१४/ प्र.क्र.२७३/ तांशि-४, दिनांक २४.७.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी राज्यस्तरावर घेण्यात येणा-या सामायिक प्रवेश परीक्षेची (MHT-CET) पातळी / अभ्यासक्रम, पध्दती व दर्जा हा राष्ट्रीय पातळीवरील संयुक्त प्रवेश परीक्षे (JEE ) प्रमाणे निश्चित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. शासनाने दिनांक २४.७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

१. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून MHT-CET या सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये इयत्ता १२ वी च्या अभ्यासक्रमाला जास्त Weightage देण्यात येईल व इयत्ता ११ वी ला अल्प Weightage देण्यात येईल - यासंदर्भात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या तज्ञांशी विचार विमर्श करून नेमका अभ्यासक्रम व Weightage चे प्रमाण लवकरच जाहीर करण्यात येईल.
२. MHT-CET परीक्षेत Negative Marking पध्दती राहणार नाही.
३. MHT-CET परीक्षेतील Physics, Chemistry, Mathematics या विषयांचा दर्जा हा राष्ट्रीय पातळीवरील संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE ) प्रमाणे तर Biology या विषयाचा दर्जा हा राष्ट्रीय पातळीवरील NEET प्रमाणे असेल.

वरील बाबींची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार,पालक व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

( दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर यांना माहितीसाठी

E:\Budage\२०१७-१८\Engg\२०१८-१९ CET circular for students.docx